## **संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा,**

महाराष्ट्र शासन
राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग
सांताक्रुझ (पूर्व ), मुंबई ४०० ०९८

**<u>प्र वे श अ र्ज</u>**

प्रति,
मा.संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा,
राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र,
सांताक्रुझ (पूर्व ), मुंबई ४०० ०९८.

विषय : अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रमात प्रवेश मिळणेबाबत

महोदय,

मी आपल्या प्रशिक्षण केंद्रात उपरोक्त पाठयक्रमात प्रवेश घेवू इच्छितो. माझी वैयक्तिक माहिती खालीलप्रमाणे आहे.

०१. संपूर्ण नांव (इंग्रजी) :

(मराठी) :

०२. पत्रव्यवहाराचा पत्ता :

(पिनकोड सहित)

०३. दूरध्वनी / मोबाईल क्रमांक :

०४. जन्मतारीख :

०५. कायमचा पत्ता :

०६. शारिरीक पात्रता : (अ) उंची : ---------- सें.मी.

(ब) वजन : --------- कि.ग्रॅ.

(क) छाती : -------सें.मी. (सर्वसाधारण)

: --------- सें.मी. (फूगवून)

०७ आपण अनुसूचित जाती/जमातीचे आहात काय ? असल्यास प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी. : जात ------------ वर्ग ----------

०८. शैक्षणिक पात्रता

| उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचे नांव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | संस्थचे नांव | श्रेणी | विषय |
|---|---|---|---|---|
| | | | | |

०९.	यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या तांत्रिक पाठयक्रमाचा तपशील

| उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचे नांव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | संस्थचे नांव | श्रेणी | विषय |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१०.	आपण अन्य कोणत्या शैक्षणिक संस्थेत सध्या शिक्षण घेत आहात किंवा कसे ? असल्यास सोबत जोडलेले ना-हरकत प्रमाणप्रत्र भरुन द्यावे.	:

११.	आपण मोटारवाहन चालविण्याचा परवाना धारण करीत असल्यास त्याचा तपशील द्यावा.	:	अ) परवाना क्रमांक
ब) जड / हलके

१२.	क्रिडा प्राविण्याबददल माहिती व कागदपत्रे	:

१३.	राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्रात यापूर्वी आपणांस कोणत्याही कारणास्तव पाठयक्रमात प्रवेश नाकारण्यांत आला आहे काय ? असल्यास तपशील द्यावा.	:

१४.	न्यायालयामार्फत आपणांस शिक्षा झाली आहे काय ? अथवा पोलिस ठाण्यावर आपणांविरुध्द गुन्हा प्रलंबित आहे काय ? असल्यास तपशील द्यावा.	:

१५.	प्रवेश अर्जासोबत जोडलेली सहपत्रे
(अन्य सहपत्रांसह महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) जोडणे आवश्यक आहे. तसेच शाळा/कॉलेज सोडल्याचे मूळ प्रमाणपत्र (Leaving Certificate ) प्रवेशावेळी असणे आवश्यक आहे.)

अर्जासोबत पुढीलप्रमाणे प्रमाणपत्र / दाखल्याच्या सांक्षांकींत केलेल्या प्रती जोडण्यांत आल्या आहेत. १) शाळा सोडल्याचा दाखला २) एस.एस.सी.उत्तीर्ण गुणपत्रिका व बोर्ड प्रमाणपत्र ३)जातीचे प्रमाणपत्र (लागू असल्यास) ४) महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (डोमासाईल सटिर्फिकेट ) ( प्रमाणपत्र नसल्यासप्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याचे प्रयत्न चालू आहेत. )

प्रशिक्षणासंबंधीचे नियम व अटी मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. तरी वरील पाठयक्रमात मला प्रवेश मिळावा ही विनंती.

आपला विश्वासू,

(                    )

दिनांक :

# “ ना-हरकत प्रमाणपत्र“

श्री. ---------------------------------------------------------------------------- हे -------- ---------------------------------------------------------------------------------या संस्थेत सन -------------- ------- या वर्षात -------------------- मध्ये शिकत आहेत. त्यांनी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई येथे दि. ------------------- ते दि. ---------------------  या कालावधीत होणा-या अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम क्र. --------- या पाठयक्रमात प्रवेश घेण्यास हरकत नाही. सदर पाठयक्रमाचा कालावधी ६ महिन्यांचा असून हा पाठयक्रम अनिवासी असल्यामुळे पाठयक्रमाची वेळ सकाळी ०७.०० ते सायंकाळी ०६.०० पर्यंत राहणार आहे. या कालावधीत उमेदवार दिवसा दोन ठिकाणी उपस्थिती दर्शवू शकत नाही. त्यामुळे इतर ठिकाणी त्याचवेळी शिक्षण घेत असल्यास त्या ठिकाणच्या उपस्थितीची जबाबदारी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांचेवर राहणार नाही.

-------------------------------------------

प्राचार्यांची सही व शिक्का

# <u>प्रशिक्षण शुल्काचा तपशिल</u>

| अ.क्र. | शुल्काचा प्रकार | रक्कम रु. | डिमांड ड्राफटचा तपशील |
|---|---|---|---|
| १ | प्रवेश अर्ज फी | | FIRE ADVISER TO THE GOVERNMENT OF MAHARASHTRA, MUMBAI |
| | जनरल/ओपन/ओबीसी | १५०/- | |
| | एस.सी./एस.टी.साठी फक्त | १००/- | |
| २ | प्रशिक्षण शुल्क (द.म.रु.२,०००/-)<br>महाराष्ट्रबाहेरील उमेदवारांना दुप्पट दराने प्रशिक्षण शुल्क आकारण्यात येईल. | १२,०००-०० | रु.१३,६००/-<br>FIRE ADVISER TO THE GOVERNMENT OF MAHARASHTRA, MUMBAI |
| ३ | प्रमाणपत्र व गुणपत्रिका शुल्क | १००-०० | |
| ४ | सर्व्हीस चार्जेस (प्रतिदिन रु.१०/-) | १,५००-०० | |
| ५ | **ट्रेनी ॲमिनिटी फंड**<br>**(Non-Refundable)** | ५००-०० | STATE FIRE TRAINING CENTRE TRAINEES'S AMINITY FUND. |
| ६ | भोजन खर्च (अंदाजे) (प्रतिमाह) | २०००-०० | रोखीने भरावे लागतील |
| ७ | प्रशिक्षण साहित्य (अंदाजे) | १,०००-००<br>ते १,५००-०० | स्वतः खरेदी करावे लागेल. |

**टीप : वर नमूद केलेल्या शुल्कामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.**

# <u>प्रशिक्षण साहित्याचा तपशिल</u>

| अ.क. | साहित्य | नग |
|---|---|---|
| १ | खाकी हाफ पँट | २ जोडी |
| २ | सफेद हातवाले फुल गळयाचे बनियान | २ जोडी |
| ३ | बाऊन कॅनव्हास पी.टी.शुज व बाऊन कलर सॉक्स | १ जोडी |
| ४ | वेबबेल्ट / कॅनवास बेल्ट | १ नग |
| ५ | डांगरी  (खाकी कलर) | २ नग |
| ६ | खाकी फुल पॅन्ट व खाकी हाफ शट<br>(पॉकेटस व शोल्डर स्टीपसह ) | २ जोड |
| ७ | बेरेट कॅप (खाकी कलर ) | १ नग |
| ८ | ऑक्सफड ब्लॅक लेदर शूज | २ जोड |
| ९ | गम बूट (फूल साईज ) | १ जोड |
| १० | लाईनयाड विथ व्हिसल (मरुन कलर ) | १ नग |
| ११ | नेमप्लेट  (इंगजी व मराठी ) | २ नग |
| १२ | सतरंजी (निळया व लाल पटटयाची ) | १ नग |
| १३ | चादर | १ नग |

**संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा,**

महाराष्ट्र शासन

राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र,

विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग

सांताक्रुझ (पूर्व ), मुंबई ४०० ०९८

## पाठयक्रमात प्रवेश घेणा-या प्रशिक्षणार्थ्यांसाठी प्रशिक्षणबाबत सूचना व नियम

०१. प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण केंद्रात राहणे सक्तीचे आहे. प्रशिक्षण केंद्राची अद्याप निवासी इमारत बांधण्यात आलेली नसल्यामुळे त्यांच्या राहण्याची तात्पुरती सोय प्रशिक्षण केंद्रात करण्यांत आलेली आहे. अनिवासी पाठयक्रम असल्यास प्रतिदिन रु.५/- सर्व्हिस चार्ज भरावा लागेल. पाठयक्रम निवासी असल्यास उमेदवारांना प्रतिदिन रु.१०/- प्रमाणे निवासव्यवस्था व अन्य शुल्क पाठयक्रम सुरु होतेवेळीस भरावा लागेल. तसेच निवासस्थानाबाबत सर्व सोयी उपलब्ध नसल्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांना आपल्या सामानासोबत झोपण्यासाठी आवश्यक सतरंजी, चादर आणणे आवश्यक आहे.

०२. केंद्रातील भोजन व्यवस्थेचा अवलंब करणे सक्तीचे आहे. प्रशिक्षणार्थ्यांच्या भोजनाची व्यवस्था प्रशिक्षणार्थ्यांनी स्वयंपाकीच्या मदतीने सहकारी तत्वाने कार्यान्वित करावयाची आहे. त्यासाठी दरमहा रु.२०००/- सरासरी भरावे लागतील.

०३. प्रशिक्षणार्थींनी दोन सेटस खाकी हाफ पॅन्टस, दोन सफेद हातवाले फुल गळयाचे बनियान तसेच ब्राऊन कॅनव्हास शुज, ब्राऊन सॉक्स, वेबबेल्ट, गमबूट, डांगरी, खाकी फुलपॅन्ट व हाफ शर्ट (पॉकेटस व शोल्डर स्ट्रीपसह) १ जोड, १ बेरेट कॅप इत्यादी सरावासाठी प्रशिक्षणार्थींनी आणणे आवश्यक आहे. फायरमन ॲक्स, हेल्मेट या दोन वस्तू केंद्रातर्फे प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कालावधीपुरते पुरविले जातील. ट्रेनिंग किटसाठी अंदाजे रु.२,५००/- खर्च अपेक्षित आहे.

०४. दर महिन्यास लेखी परिक्षा घेण्यांत येईल. उत्तीर्ण होण्यासाठी किमान ४० टक्के गुण आवश्यक आहेत. प्रशिक्षणाच्या अखेरीस लेखी/सरावाची (प्रॅक्टीकल) परिक्षा घेण्यांत येईल व उत्तीर्ण होण्यासाठी किमान ६० टक्के गुणांची आवश्यकता आहे. अंतिम लेखी परिक्षेच्या गुणपत्रिका व प्रमाणपत्रासाठी रु.१००/- शुल्क आकारले जातील. प्रमाणपत्रांवर गुणांनुसार श्रेणी दिल्या जातील.

०५. जे प्रशिक्षणार्थी सर्व परिक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण होतील त्यांना उत्तीर्ण झाल्याबाबत प्रमाणपत्र देण्यांत येईल. जे प्रशिक्षणार्थी परिक्षेत उत्तीर्ण होणार नाहीत, त्यांना पुढील सत्राच्या परिक्षेला पुन्हा बसावे लागेल. सर्व साधारण पुढील सत्राच्या परिक्षेसाठी उमेदवारांनी केंद्राच्या संपर्कात राहणे ही संबंधितांची जबाबदारी असेल. अनुत्तीर्ण झाल्यानंतर पुन्हा परिक्षेस बसण्याची संधी दोन वेळा आहे.

०६. प्रशिक्षण काळात प्रशिक्षणार्थींना केंद्राची स्वच्छता, परिरक्षण, बागकाम, साधनसामुग्री इ. चे परिरक्षण वगैरे सर्व प्रकारची कामे करावी लागतील व पाठयक्रमाच्या कालावधीत सर्व नियमांचे व शिस्तीचे पालन करणे आवश्यक आहे. केंद्रात संपूर्ण पाठयक्रम दरम्यान शिस्तीला जास्त प्राधान्य असल्यामुळे शिस्त वर्तनाबददल केंद्रातून केव्हाही काढून टाकण्यांत येईल.

०७ शासकीय सुटटयांच्या दिवशी प्रशिक्षण बंद राहील. विहित केल्याशिवाय रजा मिळणार नाही. परंतू प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून प्रशिक्षण कालावधीत सार्वजनिक सुटटीच्या दिवशी व इतर कोणत्याही दिवशी व वेळी आळीपाळीने सुरक्षेचे (सिक्युरिटीचे) किंवा अन्य या व्यतिरिक्त कर्तव्ये सुपूर्द करण्यांत येतील, त्याबददल कोणत्याही प्रकारचे वेतन/मोबदला/बदली रजा अनुज्ञेय नसेल तसेच त्यांना फायर कॉलवर जावे लागेल. पुर्वसूचनेशिवाय प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षणार्थी गैरहजर राहिल्यास त्याचे प्रशिक्षण खंडीत करण्यांत येईल. कार्यमुक्त केल्यास प्रशिक्षणार्थ्याच्या तो पर्यत दिलेल्या प्रशिक्षण कालावधीच्या अनुरुप, केंद्राच्या सूचनेनुसार/ नियमानुसार प्रशासन व अन्य खर्चासाठी रकमेतून कपात करण्यांत येईल. अशा प्रकारे कपात केली जाणारी रक्कम, प्रवेश शुल्क संबंधित प्रशिक्षणार्थ्यांकडून पुरस्कृत करणा-या संस्थेने वसूल करावी व अन्य प्रकारे अनुज्ञेय खाते निहाय कार्यवाही करावी.

०८. प्रशिक्षण सत्रात सहभागी करुन घेतल्यानंतर उमेदवारांनी मोबाईलचा वापर करु नये. तसे निदर्शनास आल्यास प्रशिक्षण सत्रातून नांव कमी करण्यांत येईल

। । । । ।